Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 11/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## प्रसिद्ध लेखक, नाटककार विष्णू प्रभाकर

विष्णू प्रभाकर यांचा आज स्मृतिदिन. विष्णू प्रभाकर हे प्रसिद्ध हिंदी लेखक, नाटककार होते. प्रगतीवाद कालखंडातील एक महत्त्वाचे लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. हिंदी साहित्यात कथा, नाटक व कादंबरी हे साहित्यप्रकार त्यांनी विशेषत्वाने हाताळले. बालसाहित्य लेखनातही त्यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांचा जन्म २१ जून १९१२ रोजी उत्तर प्रदेशमधील मीरापूर येथे झाला. त्यांचे वडील दुर्गाप्रसाद हे अतिशय धार्मिक वृत्तीचे होते. त्यांची आई महादेवी एक सुशिक्षित व सुसंस्कारी स्त्री होती. त्यांच्या आईने त्याकाळात पडदा पद्धतीला विरोध केला होता. आईच्या या बंडखोर विचारांचा विष्णू यांच्यावर पुढे चांगलाच प्रभाव पडला व त्यांनी आपल्या लेखनीतून सामाजिक समस्यांवर प्रहार केला. त्यांचे प्रारंभिक शिक्षण जन्मगावीच झाले. पुढील शिक्षण त्यांनी अत्यंत अडचणीसह मामाच्या गावी पंजाब प्रांतातील हिसार येथे घेतले. मामाच्या घरची परिस्थिती ठीक नसल्यामुळे त्यांच्या शिक्षणात अडथळा आला.

कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांनी शासकीय नोकरी स्वीकारली. चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून काम करीत असताना त्यांना १८ रुपये महिना पगार मिळत असे. बुद्धीने अतिशय तल्लख असलेल्या विष्णू यांनी अशाही परिस्थितीत काम करीत असताना आपले शिक्षण सुरूच ठेवले. हिंदी भाषेत त्यांनी प्रभाकर व हिंदीभूषण या पदव्या प्राप्त केल्या. सोबतच संस्कृतमध्ये प्रज्ञा व इंग्रजीत बी. ए. ची पदवी प्राप्त केली. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात त्यांनी आपल्या लेखनीचे ध्येय निश्चित केले व स्वातंत्र्यासाठी ते सतत संघर्ष करीत राहिले. विष्णू प्रभाकर हे हिंदीतील सिद्धहस्त लेखक होते. मुख्यतः ते कथाकार म्हणून ओळखले जातात. याशिवाय त्यांनी चरित्र, कादंबरी, आत्मचरित्र, बालसाहित्य व नाटक लिहून आपला ठसा हिंदी साहित्यात उमटविला आहे. अशा या प्रसिद्ध लेखकाचे ११ एप्रिल २००९ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 11, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401